MHAH230007842018

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३३३/२०१८ मधील नि.३८ वरील आदेश</u>**

**<u>(मनसुखलाल ताराचंद नहार व इतर वि. पोपट शिवराम भोसले व इतर)</u>**

**१.** अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, त्यांनी सदर दावा हा दावा मिळकतीची मोजणी होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ हे दि. ०३/०९/२०२४ रोजी मौजे बेलवंडी बु. येथे मयत झाले आहेत. तरी अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. १ चे वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश होवुन तशी निशाणी १ ला दुरुस्ती करण्याची परवानगी अर्जदारांनी मागितली आहे. सदर दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे काहीएक नुकसान होणार नाही अथवा दाव्याच्या स्वरूपामध्ये कोणताही बदल होणार नाही. सबब अर्ज मंजुर कराण्यात यावा.

**३.** प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्ज मंजुर होण्यास हरकत घेतली आहे. त्यांच्या कथनानुसार अर्ज मुदतीत दाखल केलेला नाही. सदरचा अर्ज खरा व बरोबर नाही. वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब केलेला आहे. तरी अर्ज खर्चासह रद्द करण्याची त्यांनी विनंती केली आहे.

**४.** अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत अर्ज दि. २१/११/२०२४ रोजी दाखल करण्यात आला आहे. मृत्यु प्रमाणपत्र निशाणी ३७ चे अवलोकन केले असे दिसून येते की, प्रतिवादी क्र. १ पोपट शिवराम भोसले हे दि.०३/०९/२०२४ रोजी बेलवंडी बु. ता.

श्रीगोंदा येथे मयत झाले आहेत. प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीची मोजणी होवुन मिळण्यासासठी दाखल करण्यात आलेला आहे. सबब प्रतिवादी क्र. १ चे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक आहे. तरी प्रतिवादी क्र.१ चे प्रस्तावित वारस अभिलेखावर घेवुन त्याअनुषंगाने दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज नि. ३८ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. १ चे प्रस्तावित वारस दाव्यात समाविष्ट करुन त्याबाबतची आवश्यक दुरुस्ती पुढील तारखेपर्यत मुळ दाव्यात करावी व तशी दुरुस्त प्रत दाखल करावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.01.03 15:57:16 +0530

श्रीगोंदा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

दिनांक ०३/०१/२०२५. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.